## दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना

१. सदर लिंक ही फ़क्त दिव्यांग उमेदवारांनी अद्ययावत करावयाची आहे.

२. उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार असल्याने लेखनिकाची शैक्षणिक अर्हता उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक टप्पा कमी असणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवाराने विहित नमुन्यामध्ये **(नमुना क्रमांक -१)** वचनपत्र (Letter of Undertaking for Using Own Scribe in PDF format) भरुन संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.

३.दिव्यांग उमेदवाराने लेखनिकाच्या निवडीसंदर्भातील सदर सूचनांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केले असल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवार व लेखनिकावरील इतर कायदेशीर कारवाईसह संबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करण्यात येईल.

४. लेखनिकाची आणि /अथवा अनुग्रह कालावधीची मागणी करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी संबंधित उपकेंद्रप्रमूख/ समवेक्षक यांचेकडे सर्व संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणी करता सादर करणे अनिवार्य आहे.

५. लेखनिकाची आवश्यकता असणा-या व केवळ अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे...

(i) शासन निर्णय ,सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ अथवा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रवि- २०१८/ सीआर ४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर २०१८ नुसार संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यांत आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान ४० % दिव्यांगत्व असलेबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची स्वसाक्षांकीत छायांकित प्रत.

(ii) दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहीण्यासाठी सक्षम नसल्याबाबत विहित प्राधिका-याने प्रमाणित केलेले मूळ प्रमाणपत्र **(नमुना क्रमांक — २ )** (Certificate regrding physical Limitation in an examince to write ) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

(iii) लेखनिकाचे मूळ आधारकार्ड / पॅनकार्ड/ स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्राईव्हींग लाईसन्स/ मतदान ओळखपत्र/ पासपोर्ट यापैकी एक (ओळख पडताळणीसाठी) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत( फ़क्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

(iv) लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह दयावयाचे विहित नमुन्यातील **(नमुना क्रमांक-४)** संयुक्त प्रमाणपत्र (लेखनिकाच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोसह) (फ़क्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

(v) स्वत:चा लेखनिक वापरण्यासंदर्भात विहित नमुन्यातील **(नमुना क्रमांक -१)** मूळ वचनपत्र (Letter of Undertaking for Using Own Scribe). (फ़क्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

(vi) अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणा-या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र **(नमुना क्रमांक — ३ )**(केवळ अनुग्रह कालावधीची मागणी करणा-या उमेदवाराना लागू)

६.	मागणी करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांपैकी लेखनिकाची स्वत: व्यवस्था करणा-या उमेदवारांबाबत संबंधित लेखनिकाच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबतची जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखनिक उपस्थित नसल्याच्या कारणास्तव ऐनवेळी लेखनिकाची व्यवस्था जलसंपदा विभागाच्या कार्यालयामार्फत कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही.

७.	लेखनिकाची मदत घेण्याची मागणी करण्यात आलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनीटे याप्रमाणे अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

८.	लेखनिकाची मदत न घेता केवळ अनुग्रह कालावधीची मागणी करण्यात आलेल्या उमेदवारांनाही परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनीटे याप्रमाणे अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

९.	लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह कालावधी घेण्याबाबत विहित निकषांची उमेदवारांकडून पुर्तता होत नसल्याचे अथवा उमेदवाराने स्वतबद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास,संबंधित उमेदवाराची परीक्षेची उमेदवारी रदद करुन उमेदवारास व लेखनिकास जलसंपदा विभागामार्फ़त स्वेच्छाधिकारानुसार जलसंपदा विभागामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित (Debar) करण्यांत येईल व /अथवा इतरही कायदेशिर कारवाई करण्यांत येईल. अशा प्रकरणी उमेदवाराची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती करण्यास तो पात्र राहील.

**१०. लेखनिकाची आवश्यकता असणा-या दिव्यांग उमेदवारांनी नमुना क्रमांक १, २ व ४ भरून हे एकाच PDF मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.**

**११. लेखनिकाची आवश्यकता नसणा-या परंतू अनुग्रह कालावधीची मागणी करणा-या उमेदवारांनी नमुना २ व ३ भरून हे एकाच PDF मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.**